Smt. Rewaben Manoharbhai Patel Mahila Kala
Mahavidhyalaya, Bhandara,
Dist. Bhandara.

# Minor Research Project

(2013-2015)

Entitled

# "A Study Of The Impact Of The Role Of The Bhonsale's In Bhandara District"

(1738-1853)

Submitted to

University Grants Commission
Western Region, Ganesh Khind,
Pune - 411 007.

Submitted by

Prof. Dr. Goverdhan W. Dhote
(Assistant Professor)
Department of History
Smt. Rewaben Manoharbhai Patel
Mahila Kala Mahavidhyalaya, Bhandara,
Dist. Bhandara.

# सारांश (Summary)


महाराष्ट्राच्या पूर्वेस भंडारा जिल्हा असून राष्ट्रीय महामार्ग क्र. 6 वर भंडारा हे शहर वसलेले आहे. या जिल्हयात खेडयांची संख्या जास्त असल्यामूळे ग्रामिण जीवन हे भंडारा जिल्हयांचे प्रमुख वैशिष्टये असल्याचे जाणवते. भंडारा जिल्हयात वैनगंगा ही सर्वात मोठी नदी असून इतर सर्व छोटया नदया हया वैनगंगेलाच येवून मिळतात.

भंडारा जिल्हयातील अनेक गावे व प्रमूख शहरे राजधानी मुंबई व उपराजधानी नागपूरशी रेल्वेने जोडलेली आहेत. या जिल्हयात असलेल्या घनदाट जंगलामूळे जिल्हयाला त्यापासून आर्थिक लाभ मिळतो. इमारती लाकुड व अनेक प्रकारच्या फुलांच्या वृक्षामुळे जिल्हयांच्या समृद्धीस चालना मिळाली आहे.

भंडारा जिल्हयात तलावांची संख्या सर्वाधिक असल्यामूळे हा तलावांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. या जिल्हयातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती असला तरी विविध कारणांमूळे शेतीची उत्पादकता कमी असल्याचे दिसून येते.

जिल्हयातील औद्योगिक विकासास वाव असल्याचे दिसून येते. येथे मॅगनिजचे उत्पादन घेतले जाते तसेच बिडी उद्योग हा मोठया प्रमाणावर चालतो. पितळी भांडे बनविण्यासाठी तर हा जिल्हा फार प्रसिद्ध आहे. जिल्हयात दिवाळीचा सण मोठया उत्साहात साजरा केला जातो. या दरम्यान गोंधळ, दंडार सारखे लोकनृत्य सादर केले जातात.

भंडारा जिल्हयात अनेक प्रेक्षणिय व ऐतिहासीक स्थळे आहेत. त्यात मुख्यत्वेकरून भंडारा, अंबागड, चांदपूर, सानगडी व पवनी हे ऐतिहासीकदृष्टया महत्वाची आहेत. तर चाकाहेटी, कोरंभी, पिंगलाई, सानगडी, भंडारा व पवनी येथे हेमाडपंथी मंदीर आहेत. भंडाऱ्याच्या जवळच लागून असलेल्या आंभोरा गावातूनच मराठी काव्यग्रंथ लेखनाची सुरूवात झाल्याचे मानले जाते. तसेच आद्यकवी मुकुंदराज यांनीही येथे अनेक रचना केल्याचा उल्लेख आहे.

भंडारा जिल्हा वैनगंगेच्या खोऱ्यात आहे. भंडारा गावाचे प्राचीन नाव 'भानारा' असल्याचा उल्लेख सापडतो. या ऐतिहासीक भानाऱ्यावर वाकाटक, राष्ट्रकूट, चालुक्य, राजपूत, यादव, गवळी व गोंडराजांनी इ.स. 1739 पर्यंत राज्य केले. गोंड राज्यात देवगड येथील किल्ल्यानंतर भानारा (भंडारा) येथील किल्ल्याचे महत्वपूर्ण स्थान होते. म्हणूनच देवगडच्या गोंड राजांना भानारा अतिशय महत्वाचे वाटत होते. देवगड येथील गोंड राजघराणे

हे मुळचे छिंदवाडा जिल्हयातील हरियागढ येथील होय. देवगडापूर्वी हरियागड हीच देवगड राज्याची राजधानी होती.

देवगडावर गवळी राजांची सत्ता असतांना गोंड राजा सराबशाहाने देवगडावर स्वारी करून जिंकून घेतले. देवगडच्या गोंड राज्यांचा खरा संस्थापक जाटबा होता. कारण त्याने गवळी राजे रणशूर व धनशूर बंधूना ठार करून देवगडचे राज्य हस्तगत केले. मोगल बादशहा अकबराने सुद्धा जाटबाला राजा म्हणून मान्यता दिली होती.

जाटबाचे अधिकाराखाली भंडारा (भानारा) छिंदवाडा, शिवनी व बालाघाट, लांजी इत्यादि जिल्हे मोडत होते. जाटबांच्या मृत्यूनंतर (1620) त्याचा मोठा मुलगा दलशहा उर्फ दलपतशहा देवगडच्या गादीवर बसला. दलशहाच्या मृत्यूनंतर त्याचा भाऊ कोकशहा इ.स. 1634 मध्ये सत्तेवर आला. याच्या कारकिर्दीत दिल्लीचा मोगल बादशाह शाहजहाने थकलेली खंडणी वसूल करण्यासाठी देवगड राज्यावर (नागपूरच्या गोंड किल्ल्यावर) आक्रमण करण्याचे ठरविले. त्यानुसार शहाजहानचा सरदार खान दौराननें इ.स. 1637 मध्ये नागपूरच्या गोंड किल्ल्यावर आक्रमण केले व तो जिंकून घेतला. परंतू खंडणी प्राप्त झाल्यावर व बादशहा प्रति निष्ठावान राहण्याचे वचन दिल्यावर नागपूरचा किल्ला लोकशहाला परत करण्यात आल्या. कोकशहाच्या मृत्यूनंतर (1648) त्याचा मुलगा केशरीशहा उर्फ जाटबा द्वितीय हा सत्तेवर आला. (1648).

केशरीशहा (जाटबा द्वितीय) च्या मृत्यूनंतर (1660) गोरखशहा उर्फ दुसरा कोकशहा देवगडच्या गादीवर आला. कोकशहाच्या मृत्यूनंतर (1686) त्याचा जेष्ठ मुलगा महिपतशहा (बख्तबुलंद) याला औरंगजेबाच्या सरदारांनी देवगडच्या गादीवर बसविले. (1686)

पुढे बख्तबुलंदने राजाखान नावाच्या पठाणाला सिवनी जिल्हयातील डोंगरतालचा फौजदार म्हणून नेमणूक केली. त्याने भंडारा जिल्हयातील प्रतापगड व सानगडीचा ताबा मिळविला आणि भंडारा जिल्हयातील उत्तरेकडे अंबागड ते तिरोडा पर्यंतच्या प्रदेशावर बख्तबुलंदचा अधिकार झाला. पूढे बख्तबुलंदने राजाखानास अंबागड येथे किल्ला बांधण्यास सांगीतले व त्याप्रमाणे राजाखानाने इ.स. 1700 च्या सुमारास अंबागड किल्ला बांधला. तसेच 1704 मध्ये सानगडी येथे किल्ला बांधला.

बख्तबुलंदने 1702 मध्ये नवनागपूरचा पाया घातला. बख्तबुलंदच्या नंतर (1709) त्याचा जेष्ठ मुलगा चाँद सुलतान देवगडच्या गादीवर बसला. चाँद सुलतानच्या कारकिर्दीत सर्वत्र शांतता नांदत होती. मात्र चाँद सुलतानच्या मृत्यूनंतर त्याचा सावत्रभाऊ वलिशाहने चाँद सुलतानच्या जेष्ठ मुलाला (मीर बहादूर) ठार मारून देवगडचे सिंहासन हस्तगत केले.

म्हणून चाँद सुलतानची पत्नी राणी रतनकुँवरने आद्य रघूजी भोसलेला मदतीला बोलविले. तेव्हा रघुजीने देवगडच्या किल्ल्यावर आक्रमण करून ते जिंकून घेतले.

देवगडचा किल्ला जिंकल्यावर रघुजी पहिल्याने भंडारा जिल्हयातील गोंडाचे मजबूत ठाणे पवनी जिंकून घेतले. त्यानंतर भंडाऱ्याचा भुईकोट किल्ला जिंकण्यासाठी भंडाऱ्याकडे कुच केले. (1737) आणि सोनबर्डी व सिरसघाटच्या युद्धात रघुजीने गोंड सैन्याचा पराभव केला आणि पूढे रघुजी प्रथमने भानाऱ्याचा (भंडाऱ्याचा) भुईकोट किल्ला जिंकण्यासाठी आपल्या फौजा डोंग्यांच्या सहाय्याने वैनगंगेतून पार केल्या आणि भानारा किल्ल्यात वेढा दिला व फितुरीचा मार्ग अवलंबून भानारा किल्ला 22 दिवसानंतर जिंकून घेतला व नंतर देवगडकडे कुच केले. एकंदरीत भंडारा व आसपासच्या प्रदेशावरिल देवगडच्या गोंड राजांचा अधिकार संपून तेथे रघुजी पहिल्याचा अधिकार प्रस्थापित झाला.

भंडाऱ्यानंतर रघुजीने राणी रतनकुँवरची वलिशहाच्या कैदेतून सुटका करण्यासाठी देवगडकडे प्रयाण केले आणि देवगडच्या किल्ल्याला वेढा दिला. देवगडचा राजा वलिशहा व रघुजी भोसले यांच्या सैन्यात लढाई होवून त्यात वलीशाह मारला गेला व किल्ला मराठयांच्या ताब्यात आला. राणी रतनकुँवर व तिच्या दोन मुलांची कैदेतून सुटका करण्यात आली. त्यानंतर राणी रतनकुँवर व राजे रघुजी भोसले यांच्यात 2 फेब्रुवारी 1739 रोजी देवगडचा तह झाला.

1749 मध्ये रघुजी बंगाल मोहिमेवर असतांना देवगडचा राजा बुऱ्हाणशहाचा दिवाण रघुनाथ सिंगाने बंड करून रघुजीची सत्ता झुगारून दिल्याने रघुजीने रघुनाथ सिंगावर आक्रमण करून त्याला ठार मारले व बुऱ्हाणशहाला नागपूरला आणले. बुऱ्हाणशहाला भोसल्यांकडून वार्षिक पेंशन मिळू लागली. 1743 मध्ये देवगडच्या गोंड राजांची सत्ता संपूष्टात आली व देवगडचे राज्य नागपूरच्या राज्यात विलीन करण्यात आले.

14 फेब्रुवारी 1755 मध्ये रघुजी भोसले प्रथमच्या मृत्यूनंतर जानोजी भोसले सत्तेवर आले. (1755) पेशवा नानासाहेबाने जानोजीला 'सेनासाहेब सुभा' हे पद दिले. 23 जून, 1761 रोजी पेशवा नानासाहेबांच्या मृत्यूनंतर मराठयांचे शत्रू प्रबळ होवू लागले. तेव्हा जानोजीने बुंदेलखंडात जावून मराठयांचा धाक पून्हा निर्माण केला.

नानासाहेबांच्या मृत्यूनंतर पूण्यात गृहयुद्धाला सुरूवात झाली. त्यात जानोजी व मुधोजी परस्पराविरूद्ध उभे ठाकले. तेव्हा पेशवा माधवरावाने जानोजीला निजामापासून फोडून मराठा संघात परत आणण्याचे प्रयत्न केले. व हे करित असतांना निर्वाणीचा ईशारा दिला कि, जानोजी मराठा संघात परत आला नाही तर मुधोजीला सेनासाहेब सुभ्याचे पद

दिले जाईल. परिणामी जानोजी मराठा संघात परत आला. परंतू नंतर जानोजीने रघुनाथरावाची बाजू घेतल्याने पेशवा माधवराव त्याच्यावर नाराज होता. तेव्हा निजाम व पेशव्याने एकत्र येवून नागपूरवर स्वारी करण्याचे ठरविले. त्यामुळे जानोजीने पेशव्यांसी तह केला. परंतू 1768 मध्ये माधवराव रघुनाथरावात पून्हा सुरू झालेल्या संघर्षात जानोजीने रघुनाथरावाची बाजू घेतल्यामूळे पेशवा माधवरावाने नागपूरवर स्वारी केली व नागपूर नंतर पेशव्याने भंडाऱ्यावर स्वारी करून (1768) भंडाऱ्याचा भुईकोट किल्ला जिंकून घेतला व भंडाऱ्यावर अधिकार प्रस्थापित केला.

इ.स. 1772 मध्ये जानोजीच्या मृत्यूनंतर मुधोजी व मुधोजीच्या मृत्यूनंतर (1788) नागपूर राज्यांची सर्व सत्ता दुसऱ्या रघुजीच्या हाती आली. खडर्याच्या लढाईत (1795) निजामाविरूद्ध उत्कृष्ठ कामगिरी बजावल्यामूळे पेशवा सवाई माधवरावाने रघुजी दुसऱ्याचा सत्कार करून गढा–मंडल्याची सनद दिली. दुसऱ्या इंग्रज–मराठा युद्धानंतर नागपूर भोसल्यांच्या राज्यात इंग्रजांचा चंचूप्रवेश झाला. 29 जानेवारी 1804 रोजी ब्रिटिशांचा रेसिडेन्ट एलफिस्टन हा नागपूरला पोहचला. 1809 मध्ये नागपूर राज्यावर पेंढाऱ्याचे आक्रमण होवू लागले होते. त्यामूळे पेंढाऱ्याच्या आक्रमणापासून भंडाऱ्यालाही वाचविता येणार नव्हते. म्हणुन रघुजी दुसऱ्याने पेंढाऱ्यावर आक्रमण करून त्यांचा पराभव केला.

22 मार्च 1816 रोजी रघुजी दुसऱ्याचा मृत्यू झाल्यावर त्याचा पूत्र परसोजी हा गादीवर आला. परंतू हा मनाने पंगू व भ्रमिष्ठ असून असुन आंधळाही होता. 1 फेब्रुवारी 1817 रोजी तो मरण पावला. त्यानंतर आप्पासाहेब भोसले 21 एप्रिल 1817 रोजी गादीवर बसले आणि सेनासाहेब सुभ्याची वस्त्रे आणण्याकरिता आपला वकिल पूण्याला पाठविला. प्रथम इंग्रजांची याकरिता संमती होती परंतू अप्पासाहेब व बाजीराव यांच्यातील गुप्त पत्रव्यवहार इंग्रजांच्या लक्षात आल्यामुळे इंग्रज रेसिडेन्ट व अप्पासाहेब यांच्यामध्ये मतभेद निर्माण झाले. या मतभेदानंतर अप्पासाहेबांनी सेनासाहेब सुभ्याची वस्त्रे ग्रहण करू नयेत. असे इंग्रजांनी सांगीतल्याने अप्पासाहेब फार संतापले व याची परिणीती 1817 च्या सीताबर्डीच्या लढाईत झाली. यात अप्पासाहेबाचा पराभव होवून इंग्रज विजय झाले व नागपूर शहरावर इंग्रजांचा अधिकार प्रस्थापित झाला. पुढे जोधपूर येथे 15 जुलै, 1840 रोजी अप्पासाहेबाचा मृत्यू झाला.

सिताबर्डीच्या लढाईत अप्पासाहेब पराभूत झाल्यावर नागपूरचे राज्य खालसा न करता ग.ज. लॉर्ड हेस्टिंग्जने दुसऱ्या रघुजीच्या मूलीचा मूलगा (बनुबाई गुजर हिचा मुलगा) बाजीबा गुजर याला गादीवर बसविण्याचे व तशी घोषणा करण्याचा आदेश रेसिडेन्ट जेन्किन्सला दिला व त्यानुसार परसोजीची बायको दुर्गाबाईने बाजीबा उर्फ बाजीराव याला

दत्तक घेवून 26 जून 1818 रोजी वयाच्या दहाव्या वर्षी तिसरा रघुजी या नावाने गादीवर बसविले. हा अल्पवयीन असल्याने बाकाबाईने राज्यकारभार चालविण्याचे ठरले. परंतू राज्याचा मुलकी व सैनीकी कारभार रेसिडेंटच्या हाती होता. त्याने नागपूरचे राज्य पाच जिल्हयात विभाजीत करून त्यावर तिसऱ्या रघुजीच्या नावाने इंग्रज अधिकारी नेमले. त्यानुसार भंडारा जिल्हयासाठी कॅप्टन विल्किन्स याची नेमणूक करण्यात आली.

1826 मध्ये रघुजी तिसरा सज्ञान झाल्यावर त्याच्याकडे नागपूरचे राज्य सोपविण्यात आले असले तरी 13 डिसेंबर 1826 च्या इंग्रज व तिसऱ्या रघुजीमध्ये झालेल्या तहानुसार रेसिडेंटला राज्याच्या कारभारात हस्तक्षेप करण्याचे प्रचंड अधिकार मिळाले. यामूळे रघुजी तिसऱ्याचे राज्यकरण्याचे पूर्ण स्वातंत्र्य या तहामूळे हिरावल्या गेले. जेन्किन्सनंतर वाईल्डर हा नागपूरचा रेसिडेंट म्हणून आला. तिसऱ्या रघुजी सोबद त्याचे चांगले संबंध होते.

इ.स. 1828 मध्ये तिसऱ्या रघुजीने संपूर्ण राज्याचा दौरा केला. त्यावेळेस भंडारा जिल्हयाचाही दौरा करून संपूर्ण भंडारा जिल्हयाच्या राजस्वासंबंधीची माहिती प्राप्त केली. या दौऱ्यामूळे येथील शेतकऱ्यामध्ये आत्मविश्वास निर्माण झाला. एकूण 1830 पर्यंत नागपूरचे प्रशासन प्रत्यक्ष राजाच्या हाती होते. तर भंडारा जिल्हयाचा कारभार मात्र युरोपीयन अधिकारी राजाच्या वतीने सांभाळीत असे. परंतू ऑक्टोबर 1829 मध्ये ब्रिटिश व रघुजी तिसरा यांच्यात झालेल्या तहातील कलम 8 व कलम 9 ही दोन कलमे राजाचे पूर्ण स्वातंत्र्य हिरावणारी असल्याने ही दोन कलमे रद्द करून नविन तह करण्यात आला. या तहातील कलम 9 प्रमाणे प्रत्यक्ष भंडारा जिल्हा तिसऱ्या रघुजीच्या हातात येणार होता. त्यानुसार 15 जानेवारी 1830 रोजी रघुजी तिसऱ्याने तहावर सही केली व यानुसार भंडाऱ्यासह चार जिल्हे रघुजीच्या ताब्यात आले. या जिल्हयावर रघुजी तिसऱ्याने आपले अधिकारी नेमले. त्यात भंडारा जिल्हयाचा जिल्हेदार म्हणून यादवराव यांची नेमणूक करण्यात आली.

11 डिसेंबर 1853 रोजी तिसरे रघुजी मृत्यू पावले. दत्तक विधानाचा प्रश्न उपस्थित करून लॉर्ड डलहौसीने 12 मार्च 1854 रोजी भोसल्यांचे राज्य खालसा केले.

---------